विवाह! वेदांमध्ये सांगितलेल्या सोळा संस्कारांपैकी हा एक महत्वाचा संस्कार! उभयतांच्या आयुष्यातील एक महत्वाचे वळण. सप्तपदी करून नववधू घरात येऊ घातली की, उभयतांना वेध लागतात ते मधुचंद्राचे! विवाहपश्चात हे दुसरे महत्वाचे वळण! एकमेकांना निवांतपणे खऱ्या अर्थाने ओळखण्याचे, समजून घेण्याचे हे दिवस. भविष्यातील सुखी संसाराचे बीज इथेच पेरले जाते. त्यामुळेच या स्थळाची निवडही तितकीच महत्वाची असते.

यासाठी आम्ही आमच्या कंपनीच्या अनुभवावर आधारित भारतातील व इतर देशातील काही खास स्थळे सुचवत आहोत. कारण या स्थळांचा, हॉटेल्सचा रिपोर्ट खूप चांगला आहे. जेथे तुम्ही निवांत राहू शकता, गुजगोष्टी करू शकता. स्थलदर्शन (जे तुमच्या आवडीचे असेल) करू शकता.

<u>भारतातील स्थळे</u>

<u>हिमाचल प्रदेश:</u> शिमला – कुलू मनाली – शिमल्यामधील कुफ्री हा स्पॉट अप्रतिम आहे. फक्त घोड्यावरून जाणे अनिवार्य आहे. कुलूमधील शाल फॅक्टरी, मनालीमधील रोहतांग पास, हिडींबा मंदीर, वशिष्ठ बाथ ही सगळी निसर्गरम्य स्थळे मनाला मोहून टाकतात. इच्छा असल्यास रिव्हर राफ्टिंग किंवा बंजी जंपिंगसुद्धा करू शकता. शक्यतो हनिमूनच्या वेळेस नवीन कुठलेही धाडस करू नये कारण एक आपण करतच असतो हे माझे वैयक्तिक मत. योग्य सीझन – मार्च ते जून कालावधी ५ रात्री / ६ दिवस.

<u>काश्मीर</u>

श्रीनगर – दाल लेक, चार चिनार गार्डन मुगल गार्डन, शिकाऱ्यातील सफर आणि हाउस बोटीतील मुक्काम ही श्रीनगरची मुख्य आकर्षणे. याशिवाय लाल चौकातील खरेदी हा महत्वाचा मुद्दा . पर्यटन हे काश्मीरचे उपजीविकेचे मुख्य व एकमेव साधन असल्याची जाणीव तिथल्या स्थानिक लोकांना झाली आहे व त्याप्रमाणे त्यांचा पर्यटकांकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलत चालला आहे. काश्मीरच्या मुक्कामात श्रीनगरशिवाय गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग ही अजून काही आकर्षणे. योग्य सीझन – मार्च ते जून – कालावधी ६ रात्री / ७ दिवस

<u>केरळ</u>

"देवाची स्वत:ची भूमी" म्हणून प्रसिद्ध असलेल्या केरळमध्ये निसर्गाने मुक्तहस्ताने केलेली उधळण अनुभवता येते.

मुन्नार- येथे दुतर्फा पसरलेल्या चहाच्या मळ्यांबरोबर एराविकुलम राष्ट्रीय उद्यान, कुरुंजीमाला रक्षीत उद्यान, दक्षिणेकडील उत्तुंग शिखर अनामुडी शिखर ही महत्वाची स्थळे. ठेकादीचे पेरियार राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्प ही प्रमुख आकर्षणे तर कोवालम समुद्र किनाऱ्याचे शहर म्हणून ओळखले जाते. कोवालममधील तीन बीचेस, प्रसिद्ध आहेत. ते म्हणजे समुद्र बीच, हवा बीच आणि लाईट हाउस बीच. योग्य सीझन: सप्टेंबर ते मार्च

<u>अंदमान</u>

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पदस्पर्शाने व असीम साहसाने पुनीत झालेली ही भूमी! शतश: प्रणाम. ५७० छोट्या बेटांचा समूह व पोर्ट ब्लेअर हे या द्वीप समूहाचे प्रवेशद्वार. येथील सेल्युलर जेलमधील ध्वनी प्रकाश कार्यक्रम म्हणजे सर्वार्थाने हृदयाचा थरकाप उडवणारा कार्यक्रम. येथील रॉस आयलंड, म्युझियम्स, चाथम/ सौमिल अक्वेरीयम्स ही इतर आकर्षणे! तसेच नील आयलंड व हॅवलॉक आयलंडवरील शुभ्र वाळूचा राधानगरीचा बीच खरोखरच डोळ्याचे पारणे फेडतो. शिवाय सर्व बेटांवरील वॉटर स्पोर्ट्स हे बहुरंगी आकर्षण. योग्य सीझन: ऑक्टोबर ते मार्च ५ रात्री/ ६ दिवस.

<u>भारताबाहेरील स्थळे</u>

<u>थायलंड:</u> फुकेत आयलंड हे अंदमान समुद्रातील एक टपोरा मोती आहे. स्वच्छ निळेशार पाणी; त्यात दडलेले निळ्या आकाशाचे प्रतिबिंब. फांग- गा- बे- च्या गुहा, नाईटलाईफ, अप्रतिम निसर्ग, शॉपिंग/ डायनिंग याशिवाय सुख ते दुसरे काय असणार

पटाया: थाई डिशेस चाखायला मिळणारा पटाया हा जगातील उत्कृष्ट बीचेसपैकी एक. बँकॉकपासून १५० किलोमीटर अंतरावर असलेल्या पटायामध्ये तरंगते मार्केट; नॉगनूच व्हिलेज मिनी सियाम इत्यादी प्रेक्षणीय स्थळे.

बँकॉक: थायलंडची राजधानी वॉट अरुन आणि वॉट- फो ही बौद्ध मंदिरे. ग्रँड पॅलेस. या शहराचे वैशिष्ट्य येथील स्ट्रीटफूड, खवैय्यांसाठी दिवाळी. हॉट डॉग्ज, हॉट नुडल्स सूप ऐकूनच तोंडाला पाणी सुटते. शाकाहारी लोकांसाठी सुद्धा भरपूर प्रकार उपलब्ध. याबरोबरच कॅबी, कोह समुई, कोह ताओ, कोह फा एनगात, कोह लांटा, कोह लाईप, कोह चांग, कोह फी फी, कोह सी चांग ही काही निसर्गाचा वरदहस्त असलेली बेटे म्हणजे एक विलक्षण अनुभव. योग्य सीझन: १२ महिने केव्हाही. ४ रात्री/ ५ दिवस. कमीत कमी

सिंगापूर : गगनाला गवसणी घालणाऱ्या उत्तुंग इमारतींबरोबर सुंदर निसर्गाची साथ असणारे आणि म्हणूनच गार्डन सिटी म्हणून ओळखले जाणारे ते सिंगापूर! खवय्ये आणि खरेदी यांची रेलचेल! अगदी स्थानिक वस्तूंपासून ते हाय एंड इलेक्ट्रॉनिक्स मिळणारे हे ठिकाण. सेंटोसा आयलंड, मरलायन, लिटील इंडिया ते युनिव्हर्सल स्टुडीओ नाईट सफारी आणि रात्रीचे चमचमणारे सिंगापूर दाखवणारे सिंगापूर फ्लायर ही खास आकर्षणे. योग्य सिझन - वर्षभरात केव्हाही! ४ रात्री- ५ दिवस

मलेशिया

कौलालांपूर (केएल) मलेशियाची राजधानी. एक उत्कृष्ट एशियन शहर. उत्तुंग इमारतींबरोबरच मोगल साम्राज्यातील जुन्या वास्तूंचा संगम येथे पाहायला मिळतो. हिरवीगार उद्याने, गजबजलेली दुकाने आणि आपला तोरा मिरवणारी शॉपिंग मॉल्स असे मिश्रण इथे दिसते मलाय, चिनी व भारतीय लोकांची वस्ती जास्त करून दिसते. मुख्य आकर्षण पेट्रोनास ट्वीन टॉवर्स. इतर आकर्षणांमध्ये ॲक्वेरिया, केएल बर्ड पार्क, याचा समावेश आहे. मलेशियातील धार्मिक विविधता बघायची असल्यास नेगारा मशिद, थिइन हाऊ टेंपल, जमेक मशिद इत्यादी स्थळांना भेट देऊ शकता. योग्य सीझन- वर्षभर.

लंकावी

भात शेती, पर्वताच्या उतारावरची मोठी जंगले, द्वीप समूहावरची केबलकार ही आहे लंकावी शहराची व्याख्या. मलेशियातील प्रमुख पर्यटन स्थळ. लंकावी केबलकार मधून समुद्राचे व आसपासच्या बेटांचे विहंगम दृश्य दिसते. इतर नैसर्गिक आकर्षणात दायांग बंटींगवरील लेक ऑफ प्रेग्नंट मेडन, मरीन लाईफ आणि वाइल्ड लाईफ पार्क्स आणि ड्युटी फ्री शॉपिंग यांचा समावेश होतो. योग्य सीझन- वर्षभर! ५ रात्री / ६ दिवस.

बाली, इंडोनेशिया

इंडोनेशियातील १७५०० बेटांच्या द्वीपसमूहातील बाली हे एक नितांत सुंदर बेट. मोठी जंगले, जिवंत ज्वालामुखी, गूढ मंदिरे व बरेच काही. सेमिनयाक किनाऱ्यावरील वॉटर स्पोर्ट्सबरोबर तनहा लॉट मंदिरावरचा सूर्यास्त बघण्यासारखा आहे. येथील मंदिरे, रूढी, नृत्य ही सर्व पुरातन हिंदुत्वावर आधारित आहेत. आदरातिथ्य करणारे व खूप मवाळ अशी इथली लोकं. म्युझियम्स, स्थानिक कलाकृती, ऊलूवाटू मंदिर ही प्रमुख आकर्षणे. हनिमूनर्ससाठी उत्कृष्ट स्थळ. योग्य सिझन - जाने- जुलै, ऑक्टो- डिसेंबर

मॉरिशस

अतिशय नितळ निळ्याशार समुद्राचे किनारे, तेसुद्धा पांढऱ्या शुभ्र वाळूचे हे मॉरिशसचे वैशिष्ट्य. आपल्या पुण्यापेक्षा लहान असे हे बेट, स्वच्छ समुद्र, धबधबे, दुतर्फा उसाची शेती, विविध

वाइल्ड लाईफ, इल ऑक्ससर्फ आयलंड, सेवन कलर ऑफ अर्थ (शामारेल) ट्राउ ऑक्स सर्फचा निद्रिस्त ज्वालामुखी, बोटॅनिकल गार्डन ही प्रमुख आकर्षणे. हसतमुख आणि प्रेमळ लोकं ही मॉरिशसची खरी ओळख. जानेवारी- जुलै व ऑक्टो-डिसेंबर ४ रात्री – ५ दिवस

ऑस्ट्रेलिया

मेलबोर्न – व्हिक्टोरियन काळातील वास्तुरचना, अप्रतिम पायाभूत सोयीमुळेच मेलबोर्न "जगातील सर्वात जास्त राहण्यालायक शहर'' समजले जाते. खूप साऱ्या आर्ट गॅलरीज, उपहारगृहे आणि सिनेमागृहांमुळे सतत गजबजलेले हे शहर. फ्लींडर्स स्ट्रीट स्टेशनची अतिशय आकर्षक वास्तू, मेलबोर्न क्रिकेट मैदान किंवा मेलबोर्न पार्क, युरेका टॉवरवरून रात्रीचे दिसणारे अप्रतिम शहर, ग्रेट ओशन रोड ही काही आकर्षणे.

गोल्डकोस्ट क्वीन्सलँड स्टेटमधील गोल्डकोस्ट अप्रतिम असे कोस्टल शहर. ऑस्ट्रेलियातील उच्चभ्रू असे हे पर्यटन स्थळ मानले जाते. खरतर त्या देशातील पर्यटन उलाढालीत गोल्ड्कोस्टचा नंबर खूप वरचा लागतो. सर्फर्स पॅराडाइज म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शहरात थीम पार्क्स, कॅरेबियन वाइल्ड लाईफ सँक्च्युअरी, सी वर्ल्ड, वॉर्नर ब्रदर्स स्टुडीओ गोल्डकोस्ट हिंटरलँड ही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

सिडने – हार्बर सिटी म्हणून हे शहर ओळखले जायचे कारण कित्येक मैल पसरलेला किनारा आणि स्वच्छ समुद्र किनारे. सिडने ऑपेरा हाउस आणि सिडने हार्बर ब्रिज ही जागतिक पातळीवर प्रसिद्ध असलेली ठिकाणे. याशिवाय हार्बर क्रुज, क्वीन व्हिक्टोरिया इमारत आणि बरेच काही. ऑस्ट्रेलियासाठी योग्य सिझन – जाने ते जुलै व ऑक्टो-डिसेंबर

न्युझीलंड

ऑकलंड

निसर्गसौंदर्याने नटलेले शहर ज्याच्यापासून स्वच्छ समुद्रकिनारा, दाट जंगल, मोहात टाकणारी बेटे आणि वाइल्डलाइफ काही मिनिटाच्या अंतरावरच आहेत. ऑकलंड स्काय टॉवर, वायेटमाटा हार्बर, ऑकलंड वॉर मेमोरियल म्युझियम, वन ट्री हिल, वायहेके आयलंड, व्हायाडक्ट हार्बर, सी लाईफ अक्वेरीयम ऑकलंड सिटी सेंटर अल्बर्ट पार्क आणि बरीच काही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

रोटुरुआ- माओरी वॉरिअर्सच्या मूळ वातावरणात एक सुंदर अनुभव आपल्याला मिळतो, तो रोटुरुआ मध्ये. त्याशिवाय न्युझीलंड ट्रीप अपूर्ण राहते. जगातील सर्वात मोठे गरम पाण्याचे झरे, फ्राईंग लेक हे वाईमांगु व्होल्कॅनिक व्हॅलीत आहेत. टेपुईया येथील पोटुटूली दिवसातून २० वेळा ३० मीटरपर्यंत उसळी मारतो. हेलगेट मधील गरम पाण्याचा धबधबा हे एक आश्चर्यच आहे. जगातील सर्वात वेगळा स्पॉट असे याचे वर्णन करता येईल.

क्वीन्सटाऊन : ॲडव्हेंचर स्पोर्ट्ससाठी प्रसिद्ध असलेले हे शहर लेक वाकाटिपूच्या बाजूला वसलेले आहे. दक्षिण आल्प्स व बरच लेक्स या शहरात बघता येतील. उदा. लेक वानाका किंवा लेक हेविआ. बंजी जंपिंग, स्काय डायव्हिंग, माउंटन बाईकिंग असे विविध प्रकार या व्हॅलीत करू शकतो.

ख्राईस्टचर्च २०१० व २०११ च्या मोठ्या भूकंपानंतरसुद्धा ख्राईस्टचर्च हे न्युझीलंडमधील एक उत्कृष्ट शहर म्हणून ओळखले जाते. प्रमुख आकर्षण – एअरफोर्स म्युझियम, बोटॅनिकल गार्डन, पंट राईड ऑन अव्हान रिव्हर, रिकर्टन संडे मार्केट ही प्रेक्षणीय स्थळे.

न्युझीलंडसाठी योग्य सिझन – जाने- जुलै ऑक्टो-डिसेंबर, ८ रात्री ९ दिवस

युरोप

स्पेन- माद्रिद कला व सृजनशीलता याचा उत्कृष्ट संगम येथे पाहायला मिळतो. ऐतिहासिक वारसा असलेल्या जुन्या वास्तू आणि अप्रतिम वातुशास्त्राचे नमुने इथे पाहायला मिळतात. रेटीरो पार्क, प्राडो म्युझियम, गेट वे ऑफ सन, रॉयल पॅलेस, मरकॅडो डी सान मायग्युएल टेंपल ऑफ डेबोड इत्यादी प्रेक्षणीय स्थळे.

सेव्हिली ३००० वर्षांपूर्वी ग्रीक देवता हरक्युलसने स्थापलेले शहर. अल्काझार ऑफ सेव्हीली कॅथेड्रल, प्लाझा डी एस्पाना, प्लाझा डी टोरोस, पार्क मारिया लुईसा ही काही निवडक प्रेक्षणीय स्थळे.

बार्सिलोना स्पेनमधील कॅटालोनियाची ही राजधानी. रोमन अवशेष सुंदर समुद्रकिनारे आणि कलाविष्काराचा खजिना हे या शहराचे वैशिष्ट्य. पार्क गुएल कासामिला, ला साग्राडा फॅमिलिआ ही काही युनेस्कोची वर्ल्ड हेरीटेज साईट्स, कोलसेरोला हिल्स वरती हायकिंग आणि माउंटन बॅकिंगकिंवा सनसेट क्रुझचा अनुभव घ्यावा. योग्य सिझन - वर्षभर

ग्रीस

अथेन्स - ग्रीसची राजधानी. आर्थिक, सांस्कृतिक व्यापार व औद्योगिक केंद्र. जगातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक. ॲरीस्टॉटल आणि प्लेटोचे शहर. गॉडेस अथेनाचे देऊळ व ॲक्रोपॉलीस ही या शहराची वैशिष्ट्ये

मायकोनॉस - नाईटलाईफसाठी प्रसिद्ध असलेले हे शहर खऱ्या अर्थाने ग्रीसचे ग्लमर आयलंड आहे. उत्तरेला असलेले समुद्रकिनारे हे खरोखरीच स्वच्छ आणि शांत आहेत. याउलट दक्षिणेकडचे गजबजलेले.

सॅन्टोरीनी - एजियन समुद्रातील अतिशय सुंदर बेट तेथील घरांची सुंदर रचना हे या बेटाचे वैशिष्ट्य. शुभ्र पांढऱ्या रंगात न्हाऊन निघालेली घरे हे इथले वेगळेपण. योग्य सिझन- एप्रिल ते सप्टेंबर. ५ रात्री / ६ दिवस

इटली

रोम - या प्राचीन शहराकडे बघताना काळ कसा बदलत गेला आहे याची कल्पना येते. अनमोल कलेचे नमुने, सुप्रसिद्ध म्युझियम्स आणि इटालियन पिझ्झा- आणखी काय हवे? व्हॅटिकन सिटी (रोममधील दुसरा देश!) हे तर जगातील प्रत्येक ख्रिश्चन माणसाचे पूज्य स्थान! नशीब आजमावण्यासाठी ट्राव्ही फाऊंटनमध्ये नाणे टाका किंवा आधुनिक रोम शहरातील रोमँटिक वातावरणात हिंडा.

व्हेनिस - इथल्या कॅनाल्स मधून क्रुझ किंवा गंडोला राईड्स हे इथले वैशिष्ट्य! इथले स्थापत्य व कला यांचा संगम प्रेक्षणीय आहे.

फ्लॉरेन्स - रोमन काळापासून अस्तित्वात असलेले शहर! इटलीमधील तस्कानी रिजनची राजधानी. बरीच फेस्टिवलसाठी प्रसिद्ध

मिलान - इटलीची आर्थिक बैठक, स्टॉक एक्स्चेंज, फॅशन्स व डिझाईनचे केंद्र आणि औद्योगिक क्षेत्र. तेथील इओमो हे सुंदर गॉथिक चर्च हे त्याच्या सौंदर्याची साक्ष देते. चमचमते नाईट लाईफ, ला स्केला मधील ऑपेरा, फुटबॉलचे अगाध आकर्षण या प्रमुख गोष्टी. खास करून सेंपिओन पार्क, एटीन्थ सेंच्युरी मॉंटीनेली गार्डन आणि फोर्लानिनी पार्क ही प्रेक्षणीय गार्डन्स. योग्य सिझन - फेब्रु- ऑक्टोबर ५ रात्री / ६ दिवस

लंडन – कधीच सूर्य न मावळणाऱ्या (कोणे एके काळी) देशाची थेम्सच्या किनार्यावर असलेली ही राजधानी. दर ४५ सेकंदाला उतरणाऱ्या किंवा उडणाऱ्या विमानांना दिशा दाखवणाऱ्या व जगातील सर्वात गजबजलेल्या विमानतळांपैकी एक असा हिथ्रोचा विमानतळ. मादाम तुसा म्युझियमसह ब्रिटीश म्युझियम्स यासह थेम्सवरचा टॉवर, ब्रिज, बकिंगहॅम पॅलेस, लंडन आय, बिग बेन, वेस्टमिनिस्टर अॅबी व इतर प्रेक्षणीय स्थळांनी नटलेले लंडन आयुष्यात एकदातरी बघावेच.

स्कॉटलंड – थक्क करणारे स्थापत्य आणि किल्ले हे एडिनबर्ग शहराचे वैशिष्ट्य. येथील प्रेक्षणीय स्थळे – हॉलीवूडपलेस पॅलेस, कार्लटन हिल्स, आर्थर सीट, एडिनबर्ग कॅसल, स्कॉटिश नॅशनल गॅलरी, रॉयल बोटॅनिकल गार्डन, चर्च ऑफ स्कॉटलंड आणि बरेच काही. योग्य सिझन – मार्च ते सप्टेंबर – ६ रात्री / ७ दिवस (कमीत कमी)

स्विझर्लंड

इंटरलाकन – भूलोकीचा स्वर्ग अशी महती असणाऱ्या स्विसमधील इंटरलाकन हे एक नयनरम्य स्थळ. स्विस आल्प्सचे प्रवेशद्वार असणाऱ्या या शहरात पॅराग्लायडिंग आणि हेलिकॉप्टर स्काय डायव्हिंगसारखे साहसी खेळ खेळू शकतो. युंगफ्रासारख्या जगप्रसिद्ध पर्वतारोहणासाठी इथूनच जावे लागते.

लूसर्न – मध्य स्विसमधील प्रसिद्ध शहर. स्विसमधील चौथ्या भव्य लेक लूसर्नच्या उत्तरेकडे असलेल्या या शहरात चॅपेल ब्रिज (लाकडी पूल), चर्चेस, ग्लेशियर गार्डन व्यतिरिक्त बरेच काही.

झुरिक – स्विसमधील ऊटलीबर्ग पर्वतासाठी इथूनच सुरुवात करावी लागते. लेक झुरिकमधील बोटिंग हा एक सुखद अनुभव.

याशिवाय जिनिव्हा, मोन्ट्रो, व्हेव्हे, झरमॅट, लुगानोसारखी अप्रतिम ठिकाणे बघण्यासारखी आहेत.

योग्य सिझन – मार्च ते सप्टेंबर – कमीत कमी ५ रात्री / ६ दिवस. खरंतर दर दोन-तीन वर्षातून एकदा भेट द्यावी असे हे ठिकाण

फ्रान्स – पॅरीस – फक्त फ्रान्सची राजधानी एवढीच याची ओळख नसून ही फॅशन व रोमान्सची राजधानी म्हणून प्रसिद्ध आहे. साईन नदीवर वसलेले हे शहर. आयफेल टॉवर, नॉत्रे – देम कॅथेड्रल, आर्क दी ट्रंफ, लेस इन्व्हॅलीड्स, शँप एलीसीस सारखी अप्रतिम स्थळे.

योग्य सिझन – मार्च ते सप्टेंबर

जर्मनी – न्युशवानस्टेन कॅसल, लिंडरहॉफ कॅसल (म्युनिक), बर्लिन, ब्लॅक फॉरेस्ट ही प्रमुख स्थळे.

योग्य सिझन – मार्च ते सप्टेंबर

ऑस्ट्रीया – इन्सब्रूक – टायरोलच्या या राजधानीपासून काही मिनिटात आपण आल्प्स पर्वतावर पोहोचतो. इंपिरियल पॅलेस, अॅमब्रास पॅलेस, गोल्डन रुफ, स्वारोव्हस्की म्युझियम इत्यादी प्रमुख आकर्षणे.

व्हिएन्ना – ऑस्ट्रीयाची राजधानी. संगीतमय शहर अशी व्हिएन्नाची ओळख आहे. (होम ऑफ मोझार्ट, बीथोव्हेन) बरेच सायकलस्वार येथे पहावयास मिळतात. हॉफबर्ग पॅलेस, शॉनब्रून व बेलवेडर पॅलेस ही प्रेक्षणीय स्थळे.

साल्झबर्ग – साऊंड ऑफ म्युझिक या प्रसिद्ध चित्रपटाचे चित्रीकरण येथे झाले आहे. वर्ल्ड हेरीटेज साईट, आल्प्स पर्वतावर जायचे प्रवेशद्वार.

योग्य सिझन - मार्च ते सप्टेंबर.

खरंतर वरील दिलेल्या प्रत्येक स्थळाबद्दल एक पण लिहिता येईल. पण जागेअभावी खूप त्रोटक माहिती देत आहे. कुठल्याही स्थळाची सखोल माहिती व तिथले हॉटेल / साईटसिंग याची माहिती हवी असल्यास संपर्क करा. आम्हाला हे करायला खूप आनंद वाटेल.

- विलास पानसे

सी. ई. ओ.

ट्रॅव्होनिका टूर्स अँड ट्रॅव्हल्स

पुणे

१, हार्मनी हाउस, ७९७/ १ ए, भांडारकर रोड

येस बँकेजवळ पुणे ४११००४

फोन क्र. २५६७०५६७ / २५६७३४५६ / ७७९८४००७४२

इमेल: travonika123@gmail.com, vilaspanse1952@yahoo.co.in